Shanti Education Society's
# A. G. Patil Polytechnic Institute, Solapur
NBA ACCREDITED PROGRAMS
(Approved by AICTE, New Delhi; Recognized by Govt. of Maharashtra; Affiliated to MSBTE, Mumbai)
ISO 9001:2015 CERTIFIED DTE Inst. Code : D6443 MSBTE Inst. Code : 0995

18(2/2A)2, Pratap Nagar, Opp. S.R.P. Camp, Vijapur Road, Solapur- 413008 (Maharashtra, India)
Ph.No.: 0217-2341899 E-mail: agppi.contact@gmail.com Web: www.agppi.edu.in

AGPPI/Admin./Internal/2023-24/194 Date: 22.03.2024

## उन्हाळी परीक्षा-२०२४ विषयकअतिमहत्वाची सुचना

### दिव्यांग परीक्षार्थीकरीता लेखी परीक्षेसाठी वेळ वाढवून किंवा लेखनिक मिळणेबाबत..

संदर्भ : मरातंशिमं / विक्रपु / विवि /उ.प.२०२४ / ज्यादा तास / लेखनिक२०२४ / ३२९, दि. २२.०३.२०२४.

सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या उन्हाळी-२०२४ लेखी परीक्षेकरीता संदर्भिय पत्रानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना म्हणजे जे विद्यार्थी ४०% पेक्षा जास्त अपंग आहेत; अशा विद्यार्थ्यांकरीता मंडळाकडून परीक्षेची वेळ वाढवून दिली जाणार आहे, तसेच खालील नमुद लेखनिक नेमणुकीच्या नियमावलीनुसार लेखनिकाच्या नेमणुकीस परवानगी दिली जाणार आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

- <u>वेळ वाढवून मिळणेबाबत</u> :

१. विद्यार्थ्याचा अर्ज.
२. प्रवेश निश्चितीचे पत्र.
३. विद्यार्थ्याचे ४०% पेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्राची छायाप्रत
(अलीकडील छायाचित्र चिकटवुन नुतनीकरण केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र)

- <u>लेखनिक मिळणेबाबब</u> :

१. विद्यार्थ्याचा अर्ज.
२. प्रवेश निश्चितीचे पत्र.
३. विद्यार्थी असमर्थ असल्याबाबतचे डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र.
४. लेखनिक म्हणून बसणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीचे बोनाफाईड सर्टिफिकेट.
५. लेखनिक म्हणून बसणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीच्या शाळेचे ना हरकत प्रमाणपत्र.
६. लेखनिक म्हणून बसणारा विद्यार्थी हा तांत्रिक शिक्षण न घेतलेला व १० वी पर्यंतच शिकलेला असावा.
७. लेखनिक म्हणून बसणारा विद्यार्थी हा परीक्षार्थीचा नातेवाईक आणि संस्थेचा कर्मचारी नसावा.

**तरी ज्या विद्यार्थ्यांना सदर संधीचा लाभ घ्यावयाचा आहे; अशांनी वर नमुद आवश्यक कागदपत्रांसह आपला अर्ज उद्या शनिवार, दि. २३.०३.२०२४ पर्यंत कार्यालयात श्री. ए. व्ही. मोफरे किंवा श्री. व्ही. ए. कदम यांच्याकडे जमा करावे.** मुदतीत अर्ज सादर न केल्यास होणाऱ्या शैक्षणिक नुकसानिस विद्यार्थी स्वतः जबाबदार असतील याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

टिप :

१. विभागप्रमुख व प्रथम वर्ष इन्चार्ज यांनी आपल्या स्तरावरून सदर महत्वाची बाब विद्यार्थ्यांच्या निर्देशनास आणून द्यावी आणि सदर लाभ घेण्यास इच्छुक कोणताही दिव्यांग विद्यार्थी लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.
२. अपवादात्मक परिस्थितीत जसे एखादया विद्यार्थ्याचा अचानक अपघात झाला किंवा अचानक नैसर्गिक दुर्घटना परीक्षार्थीच्याबाबतीत घडली तरच अशा प्रसंगी अचानक येणाऱ्या अर्जाचा मंडळाकडुन कालमर्यादा न पाहता विचार केला जाणार आहे.

A. G. PATIL POLYTECHNIC INSTITUTE SOLAPUR

22.3.24
डॉ. एम. ए. चौगुले
प्राचार्य
ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट
सोलापूर.